तात्काळ.

जा.क्र.माध्य-३[१४]/नमाशा/मान्यता/पु
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे १. यांचे कार्यालय.
दिनांक :-१२/२/१९९३.

15 FEB 1993

प्रति,

सचिव,
जिज्ञासा प्रबोधन ट्रस्ट,.........
बिबवे वाडी पुणे ३७
..............................

..............................

विषय :- सन १९९३-९४ या शैक्षणिक वर्षात नविन माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबत.....

संदर्भ :- मा. अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई ३२ यांचे पत्र क्र. एसएसएन १०९२/३१४१/माशि-१ दि. २४/१

शासनाने संदर्भीय पत्रान्वये आलेल्या [illegible] नविन माध्यमिक शाळा परवानगी देण्यावर शासनाने घातलेल्या सर्वसाधारण बंदी [illegible] उठवून खालील दर्शविलेल्या ठिकाणी इयत्ता व माध्यमातून जून १९९३ पासून विना अनुदान तत्वावर / कायम विना-अनुदान तत्वावर "विशेष बाब" म्हणून नवीन माध्यमिक शाळा, माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणाऱ्या सर्व बाबींची तसेच खाली नमूद केलेल्या अटींची पुर्तता करण्याच्या शर्तीवरच परवानगी देण्यात येत आहे.

[१] या नवीन माध्यमिक शाळांना [इंग्रजी माध्यमा व्यतिरिक्त] शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. एसएसएन १९८८/१६६९-एन माशि-२. दिनांक १०.२.८९ अन्वये विहित केलेल्या नवीन सूत्रानुसार अनुदान अनुज्ञेय होईल.

[२] सदर माध्यमिक शाळांना शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशांचे [उदा. विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत इ.] काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

[३] सदर संस्थांची आर्थिक स्थिती पुरेशी समाधान कारक असणे आवश्यक आहे.

....२/-

[४] इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळांसाठी भविष्य काळात शासनाकडून कोणत्याही प्रकारे अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही व आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी [इ.बी.सी.] फी च्या परताव्याची मागणी करण्यात येणार नाही. अशा आशयाचे संस्थेच्या अध्यक्षांचे सहीचे लेखी हमी पत्र या कार्यालयाकडे पाठविण्यात यावे.

[५] जादा उघडण्यात आलेल्या तुकड्यातून खात्याने पाठविलेले प्रवेश प्राधान्याने देण्यात यावेत तसेच प्रवेशाचे वेळी विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारची देणगी स्वीकारण्यात येवू नये.

[६] महाराष्ट्र शैक्षणिक संस्था [प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फीज] कायदा १९८७ अन्वये कोणत्याही प्रकारची देणगी/वर्गणी विद्यार्थ्यांकडून जमा करण्यात येवू नये.

[७] माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी [सेवेच्या शर्ती] नियमावली १९८१ अन्वये आखून देण्यांत आलेल्या नियमानुसार शाळेचे कामकाज करण्यात येईल.

[८] संस्थेने मान्य प्रशिक्षित कर्मचारी वर्ग तसेच १०० बिंदू रोस्टर प्रमाणे कर्मचारी वर्ग नियुक्त करण्यांत येईल.

[९] शिक्षक/कर्मचारी संच शिक्षणाधिकारी [माध्यमिक] यांचेकडून मंजूर करुन घेण्यात येईल.

[१०] माध्यमिक शाळा संहिता कलम ८३ नुसार सर्व प्रकारचे शालेय रेकॉर्ड अद्यायावत व परिपूर्ण ठेवण्यात येईल.

[११] शालेय वातावरण, इमारत, प्रयोगशाळा इ.बाबी नियमानुसार व आवश्यक त्या सुविधासह ठेवण्यात येतील.

[१२] माध्यमिक शाळा संहिता कलम ४९.३ अन्वये मा.शिक्षण संचालक, यांची पूर्व परवानगी शिवाय जादा फी आकारण्यात येणार नाही.

इतर अटी:-
-------

[१] संबंधित संस्था, मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० अगर केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत आहे.

[२] संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.

[३] सदर संस्थेने चालविलेल्या शाळा पैकी एखादा शाळेची मान्यता काढून घेतली नाही.

[४] संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

[५] संबंधित संस्थेने कायमस्वरूपी ठेव म्हणून ५०,०००/- [रुपये पन्नास हजार फक्त] अनामत रक्कम चलनाद्वारे शासकीय कोषागारात लेखाशिर्ष " ०२०२ शिक्षण क्रीडा, कला व संस्कृती ०-१- सर्वसाधारण शिक्षण" २०२ - माध्यमिक शिक्षण [संकेत क्र. ०२०२००२६] शिक्षण व इतर फी [०२] शिक्षण फी व इतर फी" खाली भरावे. [केवळ इंग्रजी माध्यम शाळांकरिता.]

वरील बाबी पैकी एक जरी बाब आपल्या संस्थेच्या विरोधात असल्यास दिलेली परवानगी आपोआप रद्द झाल्याचे समजण्यात येईल.

| अ.नं. | संस्थेचे नांव | शाळेचे ठिकाण | इयत्ता | माध्यम |
| --- | --- | --- | --- | --- |
| १. | जिज्ञासा प्रबोधन ट्रस्ट बिबवेवाडी पुणे | बिबवे-वाडी पुणे ३७ | आठवी जुन १९९२ पासुन | इंग्रजी |

आपल्या शाळेला खात्याची प्रथम मान्यतेसाठी शाळा संहिता नियमावली ३.१ नुसार शाळा सुरु झाल्यापासून एक महिन्याचे आत विहीत प्रपत्रात अर्ज करणे आवश्यक आहे. तसेच मंडळाची प्रथम मान्यतेकरीता महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या विभागीय मंडळाने संस्थांना मान्यता देण्याची पध्दती मधील नियम १ ते १५ पर्यंत विहीत केलेल्या नियमाप्रमाणे व प्रपत्रात अर्ज करावा.

स्वाक्षरी ... दाची
सही असे

[signature]
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१

प्रतिलिपी.

१. शिक्षणाधिकारी [माध्यमिक] जिल्हा परिषद पुणे यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाही करिता अग्रेषित.
त्यांनी वरील नवीन शाळेस तातडीने भेट देवून पत्रात नमूद केलेल्या अटी व बाबी संस्था पूर्ण करते किंवा नाही याची तपासणी करुन अहवाल त्वरीत या कार्यालयास पाठवावा तसेच संस्थेविरुध्द तक्रारी व गैरव्यवहाराची उदाहरणे आपल्या कार्यालयास प्राप्त झाले असल्यास त्या विषयी सविस्तर अहवालल या कार्यालयास सादर करावा. सदर नवीन माध्यमिक शाळेस प्रथम मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तातडीने करावयाची असल्याने शाळेची वर्ग-२ पेक्षा कमी नसणाऱ्या अधिकाऱ्यांकडून तपासणी करुन आपल्या अभिप्रायासह तपासणी करुन तपासणी अहवाल त्वरीत या कार्यालयास पाठविण्याची व्यवस्था करावी.

२. मा. उपसचिव, शिक्षण व सेवायोजन विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२.

३. मा.शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना माहितीसाठी सादर.

"यशवंतराव चव्हाण भवन"
पुणे जिल्हा परिषद, पुणे
जा. क्र. शिक्षण/माध्य/ जातु/ 423 /2003

दि. 13/5 /2003

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
~~विद्या निकेतन इंग्लिश मेडियम~~
~~स्कूल बिबवेवाडी पुणे-३७~~
ता. --------- जि. पुणे.

विषय :- कायम विना अनुदानित तत्वावरील इंग्रजी माध्यमिक
शाळांतील जादा तुकडयांना मंजुरी सन २००२ - २००३.

संदर्भ :- मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांचे
पत्र क्र. १७।०२।२००३.

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की आपल्या माध्यमिक शाळेस शासनाने कायम विना अनुदान तत्वावर परवानगी दिलेली आहे. तरी आपण मागणी केल्याप्रमाणे सन २००२-०३ या शैक्षणिक वर्षापासून आपल्या विद्यालयास खालील अटींची पुर्तता करण्याच्या शर्तीवर पुढीलप्रमाणे विना अनुदान तत्वावर जादा तुकडीस परवानगी देण्यात येत आहे.

| अ. क्र. | इयत्ता/वर्ग | तुकडी क्रमांक | शेरा |
|---|---|---|---|
| १) | ८ वी | २ री | |
| २) | ९ वी | २ री | |
| | एकुण | २ | |

अटी व शर्ती

१) जुलै / ऑगष्ट मधील पटपडताळणीनंतर मान्य केलेल्या पटावरील तुकडी मंजूर केलेली आहे.
२) मान्य पटापेक्षा कमी पट असल्यास / आढळल्यास सदर तुकडी नादेय राहील.
३) तुकडी मंजूर झाल्यानंतरही शाळेने सुरु केलेली नाही असे निदर्शनास आल्यास सदरची तुकडी आपोआपच रद्द होईल.
४) सदर तुकडयांचा आदेश प्राप्त होताच तुकडी / तुकडया मंजूर असल्यास अहवाल मुख्याध्यापकाने / प्राचार्याने शिक्षणाधिकारी यांचेकडे पाठवावा

मागे पहा

BOOK- POST



यशवंतराव चव्हाण भवन,
जिल्हा परिषद, पुणे
[ शिक्षण माध्यमिक ]
जा. क्र. शिक्षण/माध्य/ह-३/०५-०६ /८९०६
दिनांक : १६-०८-२००५.

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
विद्यानिकेतन इं.मि.
हाय. बिबवेवाडी, पुणे-३७.

विषय :- मान्यता प्राप्त ~~अनुदानित/विनाअनुदानित~~/कायम विनाअनुदानित माध्यमिक शाळामधून नैसर्गिक वाढीच्या व अतिरिक्त तुकड्या मंजूर करणे बाबत......

संदर्भ :- १] शासन निर्णय क्रमांक - मा. शा. अ-१००३/[३८०/२००३] मा. शि.-१ दिनांक १३ ऑगस्ट २००४.

२] मा. शिक्षण संचालक [माध्य. व उच्च माध्यमिक ] शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे - १ यांचे क्रमांक अमांशा १००४/ /२००४-०५/जा. तु. मंजूरी/१५-क व दिनांक ०८.०९.२००४ चे पत्र

३] मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग पुणे - १ यांचे क्रमांक
दिनांक

चे पत्र.

उपरोक्त विषय व संदर्भानुसार आपणांस कळविण्यात येते की, सन ~~२००१-०२~~ ~~२००२-०३ व~~ २००४-०५ या शैक्षणिक वर्षामध्ये आपण कार्यालयाकडे सादर केलेले जादा तुकडी मागणीचे प्रस्ताव व कार्यालयामार्फत करण्यास आलेली ~~प्रत्यक्ष तपासणी~~ व प्रत्यक्ष कागदपत्रांची केलेली छाननी याचा विचार करुन आपल्या विद्यालयास पुढील प्रमाणे नविन तुकड्या त्या समोर दर्शविलेल्या तपशीलप्रमाणे मंजूर करण्यात येणे आहेत.

| अ. नं. | इयत्ता | तुकडी क्रमांक | कोणत्याही शैक्षणिक वर्षापासून | जादा / नैसर्गिक वाढीव | विनाअनुदानित/ कायम विना अनुदानित |
|---|---|---|---|---|---|
| १. | ८वी | ३री | २००४-०५ | जादा | कायम विनाअनुदानित. |
| २. | १०वी | २री | —"— | —"— | —"— |
| ३. | | | | | |
| ४. | | | | | |
| ५. | | | | | |